सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 3.92 ठ. क्र. २५८ दि. 0८/0९/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरास पाटबंधारे खात्याकडून औज बंधा-यासाठी पाणी मिळते. त्या पाण्यास हिरवट पिवळा रंग प्राप्त झाला असून, शहरवासियामध्ये पिण्याचे पाण्यासंदर्भात घबराहट निर्माण झाली असून, नागरिक हे पाणी पिण्यास योग्य आहे की नाही असा प्रश्न उपस्थित करीत आहेत.

महापालिकेतर्फे कच्चे पाणी शुध्द करुन देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत. यामध्ये प्रयोगशाळांचा अहवाल हे पाणी पिण्यास योग्य आहे अशा स्वरुपाचा अहवाल प्राप्त झाला आहे. तथापी पाण्याच्या हिरवट पिवळया रंगामुळे जनतेमध्ये मोठयाप्रमाणावर नाराजी असून घबराटीचे वातावरण आहे.

मुलतः मूळ सोर्समधून येणारे पाणी हिरवट पिवळया रंगाचे आल्याने महापालिकेस यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. चिंचपूर व औज बंधा-यावरील असणा-या १७ बंधा-याची तपासणी अद्यापी पाणी प्रदुषण मंडळाने केली नाही महापालिकेची कोणतीही चूक नसताना आज महापालिका जनतेच्या असंतोषास व रोषास बळी पडत आहे.

खालील बाबीसंदर्भामध्ये कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक आहे. -

१) हिरवट पिवळे पाणी कशामुळे झाले हे पाणी प्रदुषण खात्याने महापालिकेस लेखी स्वरुपात द्यावयास हवे.
२) ज्या गोष्टीमुळे हे पाणी हिरवट पिवळे झाले त्यास कोणते कारखाने किंवा आणखी कोणते घटक जबाबदार आहेत तेही महापालिकेस सांगावयास हवे व त्यावर फौजदारी, डिझास्टर मॅनेजमेंट ॲक्ट व इतर कायद्याखाली कारवाई झाली पाहिजे.
३) भिमा नदीच्या काठावरील व औज बंधारा परिसरातील किती कारखान्यांकडे इ.टी.पी. प्लँट बसविलेले आहेत याची पहाणी होऊन ज्या ठिकाणी इ.टी.पी. प्लँट बसविलेले नाहीत त्यांच्यावर त्वरित पाणी प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कायद्याप्रमाणे कारखाना बंद करण्याची कारवाई करणे आवश्यक आहे.
४) ज्या कारखान्याकडे इ.टी.पी. प्लँट आहेत पण कारखाने त्यांचा वापर करीत नाही किंवा बंद अवस्थेत आहेत त्यांच्यावर कारवाई पाणी प्रदुषण मंडळाने तात्काळ करणे आवश्यक आहे.
५) मागील काळात इ.टी.पी. प्लँटच्या इप्लोंट मधून सोडलेल्या पाण्याच्या अनुषंगाने देखील चौकशी होणे आवश्यक आहे
६) महापालिका ही जनतेला पाणी देण्यास जबाबदार असणारी संस्था आहे पण मुलतः पाणी जर अशाप्रकारचे आले तर महापालिकेस असंख्य अडचणीस सामोरे जावे लागते त्यामुळे प्रदुषण मंडळाने प्रत्येक महिन्यास तपासणी केलेल्या अहवालाची लेखी प्रत ही महापालिकेस पाठवावी जेणे करुन अशाप्रकारचा प्रकार पुढे होणार नाही याची कल्पना महापालिकेस येऊ शकेल.
७) महापालिका ही पाणी देण्यास जबाबदार संस्था असल्यामुळे प्रत्येक महिन्यास या असणा-या बंधा-यांची तपासणी करुन त्याचा अहवाल महापालिकेस देण्याच्या सूचना द्याव्यात.
८) ज्या कारखान्यामुळे हे पाणी हिरवट पिवळया रंगाचे झाले आहे ते सर्व कारखाने तसेच याप्रकाराकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित खात्याचे अधिकारी, कर्मचारी यांच्यावर त्वरित पोलीस केसेस दाखल कराव्यात.
९) सदरील हिरवट पिवळया पाण्याबाबत १६ डिसेंबर २०१६ पासून सातत्याने असे पिवळसर पाणी येत असल्याने, यास जबाबदार असणा-या कारखान्याची माहिती मिळावी म्हणून पाठपुरावा केला आहे पण आजतागायत संबंधित खात्याने तपासणी करुन त्याचा अहवाल दिलेला नाही. यास्तव संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यावर हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व कर्तव्यात कसुर केल्याबद्दल निलंबनाची कार्यवाही करण्यांत यावी. असे मा. महाराष्ट्र शासनाकडे विनंती करण्यांत येत आहे.

तसेच सदरचे औज बंधा-यातील पिवळसर पाणी पुढे सोडून शहरवासियांच्या पिण्यासाठी नव्याने पाणी औज बंधा-यामध्ये तातडीने सोडण्याबाबतची कार्यवाही मा.महाराष्ट्र शासनाकडून करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

(सही)
प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/~~प्रामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९३ ठ. क्र. २९० 
दि. ७/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमास जेएनएनयुआरएम योजनेखाली बसेस मंजूर झालेले आहेत. यामध्ये मे. अशोक लिलॅन्ड कंपनीमार्फत पुरवठा केलेल्या बसेसच्या चेसिस निकृष्ठ दर्जाच्या असल्याने वापरणे योग्य नसल्याचे प्रादेशिक परिवहन अधिका-यांकडून नमूद करण्यांत आले आहे. तरी याबाबत कंपनी विरुध्द करावयाची कारवाई याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. असे पत्र मा.आयुक्त यांनी दिनांक २-१-२०१६ रोजी दिलेले असून, उपरोक्त विषयांच्या संदर्भात तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याने याबाबत मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव आलेला प्रस्तावाचे व मा. आयुक्त यांचे दिनांक ३०-१२-२०१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी सर्वंकष निर्णय घेणेकामी खालील मा. सदस्यांची समिती नियुक्त करण्यांत येत आहे.

१) मा. प्रा. सुशीला आबुटे - महापौर
२) मा. प्रविण डोंगरे - उपमहापौर
३) मा. पद्माकर काळे - अध्यक्ष, स्थायी समिती
४) मा. सलीम सय्यद - अध्यक्ष, परिवहन समिती
५) मा. संजय हेमगड्डी - सभागृहनेता - कन्वेनर
६) मा. कृष्णाहरी दुस्सा - विरोधी पक्षनेता
७) मा. दिलीप कोल्हे - गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस
८) मा. भिमाशंकर म्हेत्रे - गटनेता, शिवसेना
९) मा. ॲड. यु. एन. बेरिया
१०) मा. मनोहर सपाटे
११) मा. प्रा. अशोक निंबर्गी

(signature) P.A.
प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मासिक~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३९४ ठ. क्र.२६९ दि.१०/९/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरची पुण्यनगरी ही श्री. सिध्दरामेश्वराच्या वास्तव्याने पुनित झालेली असून, श्री.सिध्दरामेश्वर या पुण्यनगरीचे ग्रामदैवत आहे. तद्वतच श्री सिध्दरामेश्वरांची यात्रा दरवर्षी जानेवारी या महिन्यामध्ये शहरामध्ये संपन्न होत असते.आणि प्रत्येक वर्षी मोठया प्रमाणात हा उत्सव साजरा होत असून,शहरवासिय यामध्ये उत्साहाने भाग घेतात व धार्मिक विधीही अत्यंत वैविध्यपुर्ण रितीने वैदिक पध्दतीने संपन्न होत असतात. यात शहरवासियांच्या मोठया प्रमाणात धार्मिक भावना रुजलेल्या आहेत. याचकरिताच श्री.सिध्देश्वर देवस्थानजवळील होम मैदानाची जागा १५ डिसेंबर ते ३१ जानेवारीच्या दरम्यान श्री.सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीच्या ताब्यामध्ये देण्यांत येते. या जागेची श्री. सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीस कायमस्वरुपी आवश्यकता भासत आहे. यास्तव सदरची जागा या होम मैदानाच्या जागेची निगा श्री.सिध्देश्वर पंच कमिटीच्या वतीने राखण्यांत यावी या अटीवर सदरची जागा श्री.सिध्देश्वर पंच कमिटीच्या ताब्यात २९ वर्षे कराराने प्रतिवर्षी १/- रुपया या भाडयाने देण्यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

होम मैदानाची जागा श्री सिध्देश्वर पंच कमिटीच्या ताब्यात देण्याकामी मा.आयुक्त यांनी संपूर्ण कागदपत्रांसह प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

होम मैदान येथे श्री सिध्दरामेश्वराची यात्रा ही सालाबादप्रमाणे भरवण्यांत यावी. आणि यात्रा दरम्यानच्या काळात भाविक व नागरिंक यांना करमणूकीची साधने उभे करणेस व त्याचा उपभोग घेतेवेळेस याकामी नागरिकांना व भाविकांना धोका व अडथळा होऊ नये याकरिता होम मैदानलगत असलेला हरिभाई देवकरण ते मार्केट पोलीस चौकी दक्षिणोत्तर रस्ता हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 208 नुसार श्री सिध्दरामेश्वर यात्रा दरम्यानच्या काळात रहदारीसाठी सार्वजनिक रस्त्याचा उपयोग करण्यास मनाई करण्यास मान्यता देण्यात येत आहे. आणि दरवर्षीच्या परंपरेनुसार सदर रस्त्याचे जागेवर मनोरंजन व करमणूकीचे साधने असलेले व इतर स्टॉल उभे करण्यांस मान्यता देणेत येत आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही ठेवावी.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका